“महाराष्ट्र राज्य आरोग्य प्रशासकीय कर्मचारी संघटना” या संघटनेस शासन मान्यता देण्याबाबत....

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन निर्णय क्र. संघटना १५२०/प्र.क्र.८/१६-अ,**
मंत्रालय विस्तार इमारत, ४ था मजला,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ७ मे, २०२१.

वाचा:-

१. आरोग्य सेवा संचालनालय यांचे पत्र क्र. आसेसं/आस्था/कक्ष ५/टे-२/मराआप्रकर्म/संघटना/प्रस्ताव/ ५३९१-९२/१७, दि. ८.११.२०१७
२. आरोग्य सेवा संचालनालय यांचे पत्र क्र. आसेसं/आस्था/कक्ष-५/टे-२ /मराआप्रकर्म/संघटना/प्रस्ताव/ ३३९६/१९, दि.१६.०९.२०१९
३. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक आरजीए-१०८४/सीआर-९९/१६-अ, दिनांक १०.१२.१९८४ व शा.प.क्रमांक संघटना १५१४/प्र.क्र.२५६/१६-अ, दिनांक २७.३.२०१५
४. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संघटना १५१४/प्र.क्र.२५०/१६-अ, दिनांक १८.३.२०१५

**प्रस्तावना:-**

शासकीय कर्मचाऱ्यांच्या (औद्योगिकेत्तर) संघटनांना महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ च्या नियम २९, नियम ३० व सदर नियमावलीच्या परिशिष्ट, अनुसूची एक व अनुसूची दोन मध्ये विहित केलेल्या अटी व शर्ती तसेच "नवीन आदर्श नियम" ची घटना व नियमांच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येते. त्याकरिता अनुसरावयाची कार्यपध्दती संदर्भांकित ४ येथील शासन परिपत्रक दिनांक १८.३.२०१५ अन्वये विहित करण्यात आली आहे.

संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांच्या संदर्भ क्र.१ व २ येथील पत्रांन्वये विहित नमुन्यातील अर्जान्वये **"महाराष्ट्र राज्य आरोग्य प्रशासकीय कर्मचारी संघटना”** या संघटनेला शासन मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर संघटनेस महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ च्या नियम २९ व ३० मधील तरतूदी अंतर्गत मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरुन पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे:-

**शासन निर्णय:-**

**"महाराष्ट्र राज्य आरोग्य प्रशासकीय कर्मचारी संघटना”** या शासकीय कर्मचाऱ्यांच्या (औद्योगिकेतर) संघटनेस महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ नियम क्रमांक २९ व ३० तसेच अनुसूची दोन येथील “नवीन आदर्श नियमावली”तील नियम क्रमांक १ ते २९ मधील अटी व शर्तीच्या अधीन राहून तसेच, खाली विहित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्तीच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे:-

१. सदर संघटना ही सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांच्या प्रशासकीय अधिपत्याखाली संलग्न असेल.

२. सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रभारी सचिव सदर संघटनेच्या दफ्तर तपासणी, संघटनेच्या निवडणुका, पदाधिकारी या संबंधात वाद उदभवल्यास सक्षम अधिकारी राहतील. तसेच ते आपल्या अधिपत्याखालील अधिकाऱ्यास (जो उप सचिवांचे हुद्द्याच्या अधिकाऱ्यांपेक्षा कनिष्ठ नाही) या कार्यासाठी नामनिर्देशीत करु शकतील.

३. महाराष्ट्र राज्यातील आरोग्य संचालनालयाच्या अधिपत्याखालील वर्ग ३ चे स्थायी प्रशासकीय कर्मचारी या वर्गाचे प्रतिनिधित्व सदर संघटना करते. त्या वर्गातील शासकीय अधिकाऱ्यांच्या एकूण संख्येपैकी २५ टक्के पेक्षा कमी नाही एवढे सदस्य कायम असावेत.

४. सदर संघटनेस कोणत्याही राजकीय पक्षाशी किंवा राजकीय संघटनेशी संबंधीत किंवा राजकीय चळवळीमध्ये सहभागी होता येणार नाही. सदर संघटना सदस्यांच्या वतीने कोणतेही प्रचारात्मक किंवा प्रक्षोभक साहित्य, वृत्तपत्रातून किंवा अन्यथा प्रकाशित करणार नाही किंवा संघटनेच्या सदस्यास प्रकाशित करण्यास अनुमती देणार नाही.

५. सदर संघटनेचे कार्यवृत्त-पुस्तक, सदस्यांची नोंदवही, लेखा पुस्तके आणि प्रमाणके आणि इतर सर्व कागदपत्रे, यासंबंधात शासनाने प्राधिकृत केले असेल अशा कोणत्याही अधिकाऱ्यांना तपासणीसाठी खुली ठेवील.

६. सदर संघटनेने, शासन यासंबंधात प्राधिकृत करील, अशा अधिकाऱ्याने आवश्यक म्हणून ठरवून दिलेल्या तारखेपर्यंत संबंधित विभागाच्या सचिवांना, आपल्या सदस्यांचे वार्षिक विवरणपत्र आणि लेखापरीक्षित लेख्यांची प्रत सादर केली पाहिजे. तसेच विहित कालावधीत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडणुका घेणे बंधनकारक राहील.

७. "महाराष्ट्र राज्य आरोग्य प्रशासकीय कर्मचारी संघटना" या संघटनेने महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम,१९७९ मधील नियम क्रमांक २९ व ३० मधील विहित अटी व शर्ती तसेच उपरोक्त नमूद अट क्रमांक ३ ते ६ चे उलंघन केल्यास संघटनेची मान्यता रद्द करण्यात येईल.

२. सदर संघटनेमार्फत उपरोक्त विहीत अटींचे योग्य प्रकारे पालन करण्यात येत आहे, याबाबत सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी वेळोवेळी खातरजमा करावी व याकरिता संदर्भ क्र. ३ येथील शासन परिपत्रकात नमूद सूचनेनुसार आवश्यक ती कार्यवाही करावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२१०५०७१५४१३८८१०७ आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

TIKARAM WAMAN KARPATE

Digitally signed by TIKARAM WAMAN KARPATE
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c97a9d6b23c34fddbfe8f6f6189c08328de56af131faf7d6c0a149c3a4cf1436, cn=TIKARAM WAMAN KARPATE
Date: 2021.05.07 15:50:06 +05'30'

**(टि.वा.करपते)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/ विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई-४०० ०३२.
२. सर्व सन्माननीय विधानसभा/विधानपरिषद व संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य.
३. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई -४०० ०३५.

४. मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५. सर्व मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
६. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
७. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, जी.टी.रुग्णालय आवार, मंत्रालय, मुंबई ३२.
८. प्रधान सचिव, (विधान परिषद),महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
९. प्रधान सचिव, (विधान सभा), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय विधानभवन, मुंबई.
१०. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य
११. सह सचिव, (आरोग्य), सार्वजनिक आरोग्य विभाग,जी.टी.रुग्णालय आवार, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२. (घटनेच्या व शपथपत्राच्या साक्षांकित प्रतींसह)
१२. श्री. विजय यशवंत बोरसे, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य आरोग्य प्रशासकीय कर्मचारी संघटना, "आरोग्य भवन", पोट मजला, सेंट जॉर्जेस् रूग्णालय आवार, मुंबई (घटनेच्या व शपथपत्राच्या साक्षांकित प्रतींसह)
१३. निवड नस्ती/कार्यासन १६-अ.